RNI.NO.MAHMAR/2010/32495

# विदर्भ मतदार

बुलडाणा ■ रविवार, ११ ऑगस्ट २०१३ ■ वर्ष ४ ■ अंक १४७ ■ पृष्ठे ४ ■ मूल्य १.०० रुपया



# श्री शिवाजी महाविद्यालयात हरितपर्व - २०१३ अंतर्गत वृक्षदिंडीचे आयोजन

चिखली (विनोद पवार) श्री शिवाजी विज्ञान, कला महाविद्यालय चिखली जि. बुलडाणा येथील राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रीय छात्र सेना यांच्या संयुक्त विद्यमाने दि. ६ ऑगष्ट २०१३ रोजी वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. मा. प्राचार्य डॉ. एन.बी. भुसारी साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षसंवर्धन व पर्यावरण जागृतीच्या हेतूने महाविद्यालय परिसरात एक कर्मचारी एक वृक्ष लावण्याचे संकल्प करण्यात आले होते.

त्या अनुषंगानेच वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले होते. वृक्षदिंडीच्या निमित्ताने कडूनिंब, गुलमोहर, करंज, पिंपळ इत्यादी जातीच्या वृक्षांची रोपे सामाजिक वनीकरण विभाग, चिखली यांनी महाविद्यालयास उपलब्ध करुन दिली. ह्या वृक्षदिंडीच्या यशस्वीतेसाठी प्रा. के. डी. पेन्शनवार, डॉ. प्रा. डी. बी. बोबडे, डॉ. एम.बी. सोनुने, डॉ. व्ही. यु. पोच्छी, श्री. सिद्धेश्वर सोळंकी, प्रा. जी. एम. डोंगरे, प्रा. डी. जे. कांदे, डॉ. आर.पी. गवई, प्रा. डी. आर. सावळे व कार्यक्रम अधिकारी, प्रा. विष्णू पडवाल व सामाजिक नवीकरण विभागातील श्री. प्रफुल्ल मोरे, श्री. इंगोले साहेब, श्री. केशव सोनवणे यांनी विशेष परिश्रम घेतले. सदर वृक्षदिंडीला रासेयो स्वयंसेवक व राष्ट्रीय छात्र सेना कॅडेट उपस्थिती मोठ्या प्रमाणात होती.